# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १६५ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ श्रावण शके १९४८, गुरूवार दि.१३ ऑगस्ट २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## शेवटच्या प्रवासालाही मुलांविना पोरकी झालेली अंत्ययात्रा


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


ज्योतिर्मय साहित्य

वृद्ध आई-वडिलांच्या मृत्यूनंतरही मुलाने येण्यास नकार देणे ही अत्यंत वेदनादायी, क्लेशकारक आणि सामाजिक चिंतेची बाब आहे. अशी परिस्थिती आजकालच्या आधुनिक जीवनशैलीत, कौटुंबिक दुराव्यामुळे किंवा नातेसंबंधांमधील टोकाच्या कटुतेमुळे पाहायला मिळते.

ज्या वडिलांनी स्वतःचे आयुष्य झिजवून मुलांचे भविष्य घडवले, त्यांनाच आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात असे पोरके व्हावे लागणे हे कोणत्याही समाजासाठी लाजीरवाणे आहे. आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक जगात काही महत्त्वाची मूल्ये मागेपडत चाललीआहेत.

कृतघ्नपणा स्वतःच्या पायावर उभे राहिल्यानंतर ज्यांनी चालायला शिकवले, त्यांनाच विसरणे हा मानवी स्वार्थाचा कळस आहे.पैशाच्या आणि करिअरच्या मागे धावताना मुले अनेकदा आई-वडिलांच्या प्रेमाची आणि त्यागाची किंमत विसरतात. भौतिक प्रगती झाली तरी नैतिक आणि कौटुंबिक मूल्यांची घसरण होत असल्याचे हे जिवंत उदाहरण आहे.

अलिकडेच हरियाणातील सोनीपत आणि मध्य प्रदेशातील भोपाळ येथील वृद्धाश्रमात मरण पावलेल्या वयोवृद्ध वडिलांच्या अंत्यविधीला येण्यास मुलांनी व मुलींनी साफ नकार दिला. संपत्ती दिली नाही किंवा आमच्यासाठी काही केले नाही अशी क्षुल्लक कारणे पुढे करत जन्मदात्यांच्या मृत्यूनंतरही पाठ फिरवल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.अशीच घटना मध्यप्रदेश मधील भोपाळ मधून समोर आली आहे.

आयुष्यभर स्वतःची स्वप्ने मारून चार मुलांना लहानाचे मोठे केले, रक्ताचे पाणी करून त्यांचा सांभाळ केला; पण वृद्धापकाळात त्याच बापाच्या नशिबी अतोनात हाल आले. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमधील एका वृद्धाश्रमातली ही मन सुन्न करणारी घटना. ७० वर्षांच्या घनश्याम राजपूत यांचा वृद्धाश्रमात मृत्यू झाला. दोन दिवस त्यांचा मृतदेह नातेवाईक न आल्याने तसाच पडून राहिला. शेवटपर्यंत त्यांच्या चार मुलांपैकी एकही जण घनश्याम यांच्या अंत्यदर्शनासाठी आला नाही. उलट, आम्हाला फक्त बापाचे मृत्यूप्रमाणपत्र पाठवून द्या, अशी मागणी मुलांनी केली.

स्वतःच्या स्वार्थासाठी आई-वडिलांच्या त्यागाचा सोयीस्कर विसर पडणे हे मानवी स्वभावाचे क्रूर रूप आहे. मुले आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होतात, पण मानसिक आणि भावनिकदृष्ट्या अपगल्भ किंवा कोरडी राहतात.मृत्यूनंतरही मुखदर्शन न मिळणे किंवा मुलांनी न येणे हा त्या पित्याच्या आत्म्याला आणि संस्कारांना लागलेला मोठा डाग आहे.

ज्या वडिलांनी स्वतःचे आयुष्य झिजवून मुलांना लहानाचे मोठे केले, त्यांनाच उतारवयात अशी वागणूक मिळणे अत्यंत क्लेशदायक आणि दुर्दैवी आहे. हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून आधुनिक समाजातील एका गंभीर समस्येचे विदारक चित्र आहे.

आयुष्यभर झटणाऱ्या आईवडिलांना म्हातारपणी आधार मिळत नाही.मानवतेला कलंक: अंत्यसंस्कारासारख्या अंतिम विधीसाठीही वृद्धाश्रमाच्या किंवा सामाजिक कार्यकर्त्यांच्या हातावर मरण पावलेल्याचे ओझे टेकण्याची वेळ येते.

वृद्धापकाळात आई-वडिलांना पैशांपेक्षा तुमच्या वेळेची, प्रेमाची आणि आदराची जास्त गरज असते. अशा घटना पाहिल्या की समाजातील संवेदनशील माणसांचे मन सुन्न होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रत्येक कुटुंबात नैतिक मूल्यांचे आणि कृतज्ञतेचे संस्कार होणे अत्यंत गरजेचे आहे.

वृद्धापकाळात आई-वडिलांना किंवा आजी-आजोबांना फक्त दोन वेळच्या अन्नाची नव्हे, तर प्रेमाच्या दोन शब्दांची आणि आधाराची गरज असते.त्यांचे अनुभव ऐकून घेणे आणि त्यांना कुटुंबात महत्त्वाचे स्थान देणे हे आपली संस्कृती आणि नैतिक कर्तव्य आहे.






### निसर्गाला शब्दांत पेरणारे बालकवी


## “हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे”

ज्योतिर्मय साहित्य

श्रावणमासी हर्ष मानसी श्रावणाची सुरुवात आणि पावसाळ्यातील निसर्गरम्य वातावरण पाहिले की नकळत आठवण होते ती बालकवींची! ज्यांच्या कविता वाचत, ऐकत आपण लहानपणापासून मोठे झालो, असे हे संवेदनशील कवी.

“हिरवे हिरवे गार गालिचे,
हरित तृणांच्या मखमालीचे”

असे सुंदर शब्दचित्र उभे करून ‘श्रावणमास’ कवितेतून त्यांनी श्रावणाचे मनोहारी रूप आपल्या डोळ्यांसमोर उभे केले.



बालकवी म्हणजे निसर्गाला आपल्या शब्दांमध्ये पेरणारा कवी. निसर्गातील हिरवळ, फुले, झाडे, पक्षी, पाऊस, आकाश आणि त्यातील रंग यांच्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच वेगळी होती. अगदी लहान वयातच त्यांना निसर्गाविषयी विलक्षण कुतूहल आणि प्रेम निर्माण झाले. निसर्गातील प्रत्येक गोष्ट त्यांना काहीतरी सांगत आहे, असे वाटे आणि त्या भावनेतून त्यांच्या मनात कविता उमलत गेल्या.

बालकवींचे खरे नाव त्र्यंबक बापूजी ठोंबरे. त्यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९० रोजी धरणगाव, जि. जळगाव येथे झाला. त्यांचे औपचारिक शिक्षण फार पुढे झाले नाही; मात्र पुस्तकांपेक्षा निसर्गाच्या खुल्या शाळेत त्यांनी खूप काही शिकले. निसर्ग हाच त्यांचा जणू जीवनाचा गुरू होता. निसर्गाच्या सान्निध्यात राहून त्यांनी आपल्या भावविश्वाला समृद्ध केले.

लहान वयातच त्यांच्या मनात कविता फुलू लागल्या. निसर्गातील एखादे फूल, पक्ष्याचा आवाज, पावसाची सर, आकाशातील ढग किंवा संध्याकाळची रंगांची उधळण – या सगळ्या गोष्टी त्यांना कवितेसाठी प्रेरणा देत. त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या भावनांना त्यांनी अतिशय साध्या, गोड आणि चित्रमय शब्दांत व्यक्त केले. अशा प्रकारे त्यांचा कवितेचा प्रवास निसर्गाच्या सान्निध्यातून सुरू झाला आणि मराठी रसिकांच्या मनापर्यंत पोहोचला.

त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग केवळ सुंदर दिसत नाही, तर तो जिवंत होतो, बोलतो आणि मनाशी संवाद साधतो. फुलांमध्ये त्यांना सौंदर्य दिसते, पक्ष्यांच्या किलबिलाटात संगीत ऐकू येते आणि पावसाच्या सरींमध्ये आनंदाची अनुभूती मिळते. त्यामुळे त्यांच्या कविता वाचताना आपण केवळ शब्द वाचत नाही, तर त्या शब्दांमधून निसर्ग अनुभवतो.

बालकवींच्या काव्याची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे निसर्गप्रेम, कल्पनाशक्ती, भावनांची कोमलता आणि बालसुलभ निरागसता. त्यांच्या कवितेत निसर्ग आणि मानवी भावना यांचे सुंदर नाते दिसून येते. म्हणूनच त्यांच्या कविता वाचताना एखादे फूल आपल्याशी बोलते आहे, वारा काहीतरी सांगतो आहे किंवा पावसाच्या सरी मनाला हाक देत आहेत, असे जाणवते.

त्यांच्या ‘श्रावणमास’, ‘फुलराणी’, ‘औदुंबर’, ‘पारवा’, ‘खेड्यातील रात्र’ अशा कवितांनी मराठी साहित्य समृद्ध केले. ‘श्रावणमास’ मध्ये श्रावणातील हिरवाई आणि प्रसन्न वातावरणाचे सुंदर चित्रण आहे; तर ‘फुलराणी’ मध्ये कल्पनेचे आणि निसर्गसौंदर्याचे रम्य विश्व उभे राहते. ‘औदुंबर’ सारख्या कवितेत एका साध्या झाडाभोवतीचे निसर्गसौंदर्यही किती प्रभावीपणे अनुभवता येते, हे बालकवींनी दाखवून दिले.

विशेष म्हणजे बालकवींची भाषा सहज, साधी, गेय आणि चित्रमय होती. त्यामुळे त्यांची कविता लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आपलीशी वाटते. त्यांच्या कवितेतील शब्द जणू निसर्गाचीच चित्रे रंगवतात. म्हणूनच अनेक पिढ्या त्यांच्या कविता वाचत आणि ऐकत मोठ्या झाल्या.


सौ शुभांगी हेमंत पांगरकर
छत्रपती संभाजीनगर
9422214122




बालकवींचे आयुष्य मात्र फार मोठे नव्हते. ५ मे १९१८ रोजी रेल्वे अपघातात त्यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय अवघे २७ वर्षे होते. इतक्या अल्प आयुष्यात त्यांनी मराठी कवितेला दिलेले योगदान विलक्षण आहे. आयुष्याची वर्षे कमी मिळाली; पण त्यांच्या प्रतिभेने मराठी साहित्याला दिलेला ठेवा अमूल्य आहे.

बालकवींच्या कविता आपल्याला केवळ निसर्गाचे सौंदर्य दाखवत नाहीत, तर निसर्गाकडे प्रेमाने, कुतूहलाने आणि संवेदनशीलतेने पाहायला शिकवतात. आजच्या धावपळीच्या जीवनात आपण निसर्गाकडे पाहायलाही विसरतो; अशावेळी बालकवींची कविता आपल्याला थांबायला, आजूबाजूचे सौंदर्य अनुभवायला आणि निसर्गाशी नाते जोडायला शिकवते.

निसर्ग पाहणारे अनेक जण असतात; पण त्या निसर्गाला शब्द देणारे कवी मात्र विरळाच असतात. बालकवी हे त्यापैकीच एकमराठी कवितेच्या आकाशातील निसर्गाचा सुंदर, चिरंतन स्वर!

आजही श्रावणाच्या हिरव्यागार दिवसांत आकाशाकडे पाहिले आणि इंद्रधनुष्याची रंगीत कमान दिसली की बालकवींच्या ओळी नकळत आठवतात

“वरती बघता इंद्रधनुचा गोफ
दुहेरी विणला असे
मंगल तोरण,
काय बांधिले
नभोमंडपी कुणी भासे”

त्या इंद्रधनुष्याकडे पाहताना जाणवते की, बालकवींनी निसर्ग फक्त पाहिला नाही; त्यांनी तो आपल्या शब्दांत जपून ठेवला. म्हणूनच ऋतू बदलतील, काळ बदलेल, पण निसर्गाचा एखादा सुंदर रंग दिसला की बालकवींची कविता पुन्हा मनात उमलेल.

निसर्गाच्या प्रत्येक रंगात, प्रत्येक सुगंधात आणि प्रत्येक ऋतूच्या नव्या रूपात बालकवींची कविता आजही आपल्याला भेटत राहते आणि म्हणूनच बालकवी मराठी मनात सदैव जिवंत राहतील!

## भाई संतोख सिंह (१८९३-१९२७) : कैदेच्या आगीतून घडलेला क्रांतिकारक

ज्योतिर्मय साहित्य

गदर चळवळीच्या इतिहासात अनेक क्रांतिकारकांची नावे आपल्याला परिचित आहेत. करतार सिंह सराभा, लाला हरदयाळ, सोहन सिंह भकना, बाबा ज्वाला सिंह. परंतु या सर्व नावांच्या बरोबरीने ‘संतोख सिंह’ हे एक असे व्यक्तिमत्त्व उभे राहते, ज्यांचा जन्म सिंगापूरसारख्या परदेशी भूमीत झाला. ज्यांनी अमेरिका, कॅनडा, सियाम, बर्मा, जपान, रशिया, इराण, अफगाणिस्तान आणि भारत असा प्रवास केला. गदर पक्षाच्या संस्थापक सदस्यांमध्ये संतोख सिंह यांचा समावेश होता.पक्षाच्या गुप्त आणि भूमिगत कार्यासाठी बनविलेल्या ‘गुप्त समितीत’ सोहन सिंह भाकना आणि संतोख सिंह प्रमुख होते. अमेरिकेत हिंदू षडयंत्र खटल्यात दोन वर्षांची कैद आणि भारतात पुन्हा सहा महिन्यांचा तुरुंगवास ज्यांना भोगावा लागला, आणि तरीही जे सुटकेनंतर पुन्हा नव्याने संघटना उभारणीकडे वळले ते म्हणजे भाई संतोख सिंह. त्यांचे जीवन म्हणजे केवळ एक चरित्र नाही; तो भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दडपशाही, कारावास, पलायन, विचारपरिवर्तन आणि पुनरागमन या सर्वांचा एक सजीव दस्तऐवज आहे. त्यांची कैद केवळ शिक्षा नव्हती, तर ती त्यांच्या राजकीय विचारांच्या उत्क्रांतीची, त्यांच्या जिद्दीची आणि गदर चळवळीच्या पुढील टप्प्याची एक महत्त्वाची कडी होती. भाई संतोख सिंह यांनी दुसरी कैद भारतात भोगल्यानंतर ‘कीर्ती किसान पार्टी’ स्थापन केली तसेच ‘कीर्ती’ नावाचे मासिक १९२६ मध्ये गुरुमुखीतून सुरू केले. नंतर ते उर्दूतूनही सुरू झाले. या वृत्तपत्रातून समाजवादाचा प्रचार होत होता आणि या वृत्तपत्राने पंजाबमधील श्रमिक-शेतकरी वर्गात स्वातंत्र्य लढ्याचा जागर निर्माण केला. शहीद भगतसिंग यांचे ‘कीर्ती’ मासिकातून वेळोवेळी झालेले



लिखाण क्रांतिकारी चळवळीतील त्यांच्या विचारप्रसाराचा आणि तरुणाईला संघटित करण्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. भगतसिंग यांच्या ‘कीर्ती’ मासिकातील लिखाणामुळे अज्ञात क्रांतिकारकांचे त्यांच्या योगदानासह महत्व नावासहीत ऐतिहासिक दस्तऐवजात नोंदले गेले. भाई संतोख सिंह यांनी आपला खंबीर वारसदार म्हणून ‘कीर्ती’ मासिकासाठी आणि चळवळीसाठी सोहन सिंग जोश या स्वातंत्र्यसेनानीस पुढे आणले.

भाई संतोख सिंह यांचा जन्म १८९३ मध्ये सिंगापूर येथे झाला. त्यांचे वडील सरदार ज्वाला सिंह हे मलया राज्यात सेनेत नियुक्त होते. मलयात जन्म आणि बालपण घालवल्यामुळे संतोख सिंह यांना मलयाची स्थानिक भाषा, संस्कृती आणि सामाजिक परिस्थितीची सखोल माहिती होती. ही गोष्ट पुढे गदर पक्षातील त्यांच्या कामासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. प्राथमिक शिक्षणही त्यांनी मलयातच घेतले. लहानपणापासूनच त्यांच्या मनात शिक्षणाची ओढ होती आणि भारतात येऊन उच्च शिक्षण घ्यावे, अशी इच्छा होती. सुमारे १९०९१९११ च्या दरम्यान संतोख सिंह भारतात आले आणि अमृतसरच्या खालसा कॉलेजमध्ये उच्च शिक्षणासाठी दाखल झाले. दोन वर्षे भारतात शिक्षण घेतल्यावर त्यांना अमेरिकेत जाऊन पुढील शिक्षण घ्यावे, अशी इच्छा निर्माण झाली. १९११ च्या सुमारास ते न्यूयॉर्कला पोहोचले आणि तेथून पुढे कॅनडाला गेले. परंतु कॅनडातील भारतीय स्थलांतरित मजुरांचे दारुण जीवन, त्यांच्यावर होणारा वांशिक अपमान, आणि ब्रिटिश साम्राज्याच्या वसाहतवादी रचनेची जाणीव यामुळे त्यांनी केवळ वैयक्तिक प्रगतीचा मार्ग न निवडता राजकीय कार्याकडे स्वतःला झोकून दिले.

लोकमान्य टिळकांच्या “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे” या घोषणेचा आणि केसरी- मराठा वृत्तपत्रांचा गदर चळवळीवर आणि भाई संतोख सिंह यांच्या कार्यकर्तुत्वावर खोल परिणाम झाला. गदर चळवळीचीचे एक प्रमुख डॉ पांडुरंग सदाशिव खानखोजे हे लोकमान्य टिळक यांचे अनुयायी.टिळकांनी सुरू केलेली ‘केसरी’ मराठी भाषेतून आणि ‘मराठा’ इंग्रजी भाषेतून ही वृत्तपत्रे १८८१ पासून ब्रिटिश सरकारच्या अन्यायांवर प्रकाश टाकत होती, स्वराज्याची भावना रुजवत होती आणि जनतेत जागरूकता निर्माण करत होती. गदर चळवळ १९१३ मध्ये सुरू झाली, त्यावेळी टिळकांचे विचार आणि वृत्तपत्रीय लेखन या चळवळीतील क्रांतिकारकांना प्रेरणादायी ठरले.


शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१




(क्रमशः)



## स्थिरता आणि शांततेसाठी नियोजन असावे.

ज्योतिर्मय साहित्य

दिवसभरच्या धावपळीनंतर शेवटी संध्याकाळी, रात्री लक्षात येतं की आज फक्त ओढाताणच आपल्या पदरी पडली. अंथरुणावर पडल्यावर ही झोप लागत नाही. अनेक लोकांना तर झोपेच्या गोळ्या घ्याव्या लागतात. काहीजण व्यसनाच्या आहारी जातात.

प्रत्येक जण दिवसभर एक महत्वाची गोष्ट लक्षात ठेवत नाही की सगळी धावपळ, ओढाताण कशासाठी चालू आहे? दिवसभर आपण व्यवहाराकडे लक्ष देत असतो. एकावेळी अनेक कामं, अनेक व्यवहार असतात. काही गोष्टी काही व्यवहार आपल्या हातातले नसतात,आपल्या आटोक्यातले नसतात. ते पार पाडताना ताणतणाव होतो. हे सर्व अखेर कशासाठी चालू आहे? कोणत्या प्राप्तीसाठी चालू आहे? याचा विचार मात्र केलेला नसतो.

बहुतांशी नेमकी हीच चूक घडते की भौतिकतेच्या आहारी गेलेला मनुष्य साधनांना साध्य समजत आहे. प्रगती सोबत स्थिरता तणाव मुक्ती शांतता आंतरिक शांती हे साध्य आहे. यासाठी जी मेहनत करायची ती साधना. परंतु साधनापर्यंतच अडकत गेल्यामुळे साध्या पर्यंत पोहोचता येत नाही आणि परिणामी तो करणारा म्हणजे साधक हा अस्थिर, तणावग्रस्त, चिंताग्रस्त असाच असतो आणि दिसतो.



जीवनाचा उद्देश
© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108




आज जगात वावरत असलेल्या किती लोकांना याची जाणीव आहे की जीवनाचा प्रमुख उद्देश शांती आणि स्थिरता आहे. ही शांती आणि स्थिरता मिळवण्यासाठी दिवसभराचे सगळे व्यवहार,धावपळ आणि उठाठेव करायची असते. सकाळी उठल्याबरोबर आपण साधारणपणे न बोलता दिवसभराची कामे मनात ठरवतो. ती कशाप्रकारे करायची याची आखणी करतो. आणि ते सर्व करत असताना काही पूर्ण होतात तर काही ना अडचणी येतात. असाच दिवस निघून जातो आणि शेवटी आपण थकलो आहोत, तणावग्रस्त आहोत, अत्यंत अस्थिर अशा परिस्थितीमध्ये जबरदस्तीने झोपतो.

आपल्या नियोजनामध्ये सगळी कामं असतात परंतु स्थिरता आणि शांतीचे नियमन नसते. कुठे थांबायचे, केव्हा थांबायचे हे निश्चित नसते. सगळी कार्य पार पाडत असताना मनाला शांतता केव्हा लाभली आणि वास्तविक जगण्याचा आनंद काही मिळाला का हे आपण तपासलेले नसते. जन्माला येणे आणि मागे नाव लौकिक न ठेवता केवळ कष्टात आयुष्य कंठून एके दिवशी मरणे याला जीवन जगणे असे म्हणत नाहीत. तसेच दिवस उजाडला, धावपळ, पळापळी कष्ट सुरू झाली आणि त्यामध्येच दिवसाचा शेवट झाला हा ही दिवसाचा निरर्थक वाईट अंत आहे.

म्हणून रोजच्या दिवशी दररोजच्या कामात जशी काम करायची पद्धत ठरवलेली असते त्यातच हे विसरायला नको हे सर्व धावपळ सर्व मेहनत ही स्थिरता आणि शांती लाभावी यासाठी आहे. म्हणून कुठेतरी थांबणे मनाला समजूत घालून घेणे आणि खरोखर खऱ्या अर्थाने जगणे महत्त्वाचे ठरते.




# जात्यावरच्या ओव्या......

भरला बाजार
दादा दिसला दुरून
सोनारांच्या आळी
मांडी बसला मारून ||७९३||

भरला बाजार
भरून ओसरतो
येती जाती कितीक
देव गालात हसतो ||७९४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ६१




ज्योतिर्मय साहित्य

श्रद्धावान लभते ज्ञानम! श्रद्धावंतालाच ज्ञान प्राप्त होते. अर्थात हे ज्ञान म्हणजे परमेश्वर प्राप्तीचे ज्ञान किंवा स्व स्वरूपाचे ज्ञान. परंतु त्यासाठी संयम, विवेक आणि वैराग्य या गुणांची आवश्यकता असते. सामान्य माणसाजवळ एवढा धीर नसतो. म्हणून त्याने जी काही दोन चार पावले परमेश्वर प्राप्तीच्या मार्गावर टाकलेली असतात, तिथून तो मागे येतो. सद्गुरूंनी मला अमुक इतका जप करायला सांगितला होता. तेवढ्या संख्येमध्ये मी तो केला परंतु मला कोणताही अनुभव आला नाही किंवा परमेश्वराची प्राप्ती झाली नाही. असा विचार करून सामान्य माणूस अध्यात्ममार्गापासून ढळतो. पण ज्याची श्रद्धा अविचल असते, तो कितीही संकटे आली किंवा कितीही तपश्चर्या करावी लागली तरी त्यापासून ढळत नाही. जर त्याला कोणी सांगितले की तू एवढा जप केलास परंतु तेवढा पुरेसा नाही. तुला आणखी इतकाच जप करावा लागेल किंवा आणखी अमुक इतकी वर्षे तपश्चर्या करावी लागेल तर तो त्यासाठी आनंदाने तयार होतो. कारण त्याला माहिती असते की त्यानंतर परमेश्वर आपल्याला निश्चितपणे भेटेल. आणि अशा रीतीने ज्यांची श्रद्धा अविचल असते अशा लोकांना परमेश्वराची प्राप्ती झाल्याशिवाय राहत नाही.



म्हणून आपण संतसंगतीचा लाभ घ्यावा. त्यांच्याकडून परमेश्वर प्राप्तीचे रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. आणि त्यांच्याशी निरर्थक वाद न घालता त्यांच्या सांगण्याप्रमाणे वाटचाल करावी. वेळीच सावध होणे गरजेचे आहे हेच समर्थ या ठिकाणी आपल्याला सांगू इच्छितात. तेव्हा निजध्यास सोडू नका. संत सोहिरोबा म्हणतात, '' हरी भजनावीण काळ घालवू नको रे. ''

स्वसंवाद : १. निजध्यास केव्हा आणि का तुटतो ?


२. कीर्तन-प्रवचनानंतर वाटणारी तीव्र भक्तिभावना काही दिवसांत का ओसरते? यावर उपाय काय?

३. ''श्रद्धावान लभते ज्ञानम'' या वचनावर तुमचा दृढ विश्वास आहे का?

४. सद्गुरूंनी सांगितलेला जप केला पण अनुभव आला नाही. अशा वेळी मनात कोणते विचार येतात? तुम्ही त्याला कसे सामोरे जाता ?

५. संत सोहिरोबांची ओळ ''हरी भजनावीण काळ घालवू नको रे'' हे मला माझ्या व्यस्त आयुष्यात कसे साधता येईल?

(क्रमशः)



## ॥ अभंग-माधव ॥

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630

-------दीप अमावास्या--------

आजच्या रात्रीला । आषाढ संपतो ।
श्रावण तो येतो । निसर्गात ॥१॥
लावूया हा दीप । पसरो प्रकाश ।
निरोप तमास । दीप देतो ॥२॥
रोगराई दूर । होऊ दे सत्वर ।
निरामय कर । सारे जग ॥३॥
पुजूया आपण । पंच महाभूत ।
दीपाची ही वात । प्रज्वलूया ॥४॥
दीप आवसेचे । नाव ना गटारी ।
आहे गताहारी । नाव खरे ॥५॥
गताहार ह्याचा । अर्थ उपोषण ।
ना करू भक्षण । अभक्ष्याचे ॥६॥
दीप राहो सदा । निज हृदयात ।
उजळो मनात । ज्ञानदीप ॥७॥
माधव हा म्हणे । आजच्या ह्या दिनी ।
राहो सदा मनी । दीप तेज ॥८॥

## ॥ संजय उवाच... ॥

@संजय काव्या पुणे 7743918559

वेळ

वेळ ही प्रत्येक क्षणाला बदलत असते, वेळ ही परिस्थिती आहे, वेळेला समजणे खूप महत्वाचे असते. वेळ एकदा गेली की परत येत नाही, वेळेचे मूल्य ज्याला समजले तोच खरा हिरो. वेळेचं गणित जमलंच पाहिजे.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

'मी नाही, तू आहेस ' हे जाणणे हीच खरी भक्ती होय. भक्तीचा विषय एक भगवंत ठेवला, की बाकी सर्वांचा विसर पडतो. भक्ती केली की चित्त निर्विषय होते, हे सांगावेच लागत नाही. स्वत:चे विस्मरण आणि भगवंताचे स्मरण हेच भक्तीचे रहस्य. भगवंताची प्राप्ती पाहिजे असेल तर भक्ती करावी. भगवंताच्या चरित्रात भक्तांच्या सर्व तऱ्हा आहेत. त्यामध्ये आपण कुठे तरी खासच बसू ! भगवंताने त्या सर्वांना समाधान दिले, मग ते आपल्याला का मिळणार नाही ? जग प्रगतिपर आहे हे खरे; पण पैसा, मुले, मान्यता वगैरे ऐहिक सुखांची वाढ होणे यालाच आपण प्रगती समजतो. भगवंताची भक्ती ही खरी प्रगती होय. ही प्रगती बाहेर दिसण्यासारखी नाही. भगवंतावाचून यश हे अपयशच समजावे. कित्येक वेळा अपयश हेच यश बनते; म्हणून अपयश आले तरी, ते भगवंताच्या इच्छेने आले असे समजून शांत राहावे. 'भगवंत आहे ' असे म्हणणे किंवा मानणे याचा अर्थ असा की, ही सर्व सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे. त्या सृष्टीचे तो रक्षण आणि पालन करतो. सृष्टीमध्ये अनेक समूह आहेत, त्यांचेसुद्धा रक्षण आणि पालन तोच करतो. त्या समूहांपैकी आपण एक जीव आहोत, आणि आपलेही रक्षण आणि पालन तो सदा करीत आहे.

खरे पाहिले असता प्रत्येक मनुष्य अद्वैताचाच अभ्यास करीत असतो. अद्वैतामध्ये नेणारे द्वैत आपल्याला पाहिजे आहे. भगवंत, म्हणजे सगुण परमात्मा, असा आहे की तो वेगळा दिसतो खरा, परंतु भक्ताला तो आपल्यासारखा करून घेतो. आई आणि मुलगा यांच्यामध्ये साम्य असते. मुलाचा आवाज आईला नेहमी गोडच लागतो, त्याप्रमाणे भक्ताचा आवाज भगवंताला गोड लागतो. शेताची राखण करण्याकरिता जसे काठीवर कांबळे घालून त्याचे सोंग करतात, तसेच सगुण उपासनेचे आहे. राखणदार हजर नसताना ते सोंग ज्याप्रमाणे शेताचे रक्षण करायला उपयोगी पडते, त्याचप्रमाणे निर्गुणाच्या अभावी परमात्म्याची आठवण करून देण्यासाठी सगुण हे उपयोगी पडते. डोंगराच्या माथ्यावर चढल्याशिवाय आपले पलीकडे असलेले गाव जसे आपल्याला दिसत नाही, तसे सगुणरूपमय झाल्याशिवाय निर्गुण होता येत नाही.

जो भगवंतावर अवलंबून आहे तोच खरा स्वतंत्र होय. भगवंताचा ध्यास लागणे म्हणजे तद्रूपच होणे होय. भगवंताची प्रीती याचेच नाव भक्ती. ' माझा त्राता, माझी काळजी घेणारा, माझे रक्षण करणारा आणि पालन करणारा तो भगवंत आहे ' असे मानणे आणि तसे वागणे हीच भगवंताबद्दलची खरी अस्तित्वबुद्धी होय. आपले स्वत:वर जितके प्रेम आहे, त्याच्यापेक्षा जास्त प्रेम भगवंतावर करणे हीच खरी उपासना, आणि हेच जीवनाचे सर्वस्व होय.

संकटांचे डोंगर अंगावर पडले तरी ज्याची वृत्ती भगवंतापासून वळत नाही, तोच खरा भगवंताचा झाला.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

दीप अमावस्या

दिव्यांची पूजा आरती केल्या नंतर कहानी सांगण्याची प्रथा आहे. मनोरंजनातून उत्तम बोध देण्याचे एक प्रभावी साधन आहे.

▪ कहानी ▪

आटपाट नगर होते. तिथे एक राजा रहात होता. त्या राजाला एक सून होती. ही सून रोज घरातील सर्व दिवे घासून, पुसून स्वच्छ करीत असे. त्यात तेल भरून तिन्ही सांजेच्या वेळी ते पेटवी. त्या दिव्यांना नमस्कार करी. दीप अमावस्येच्या दिवशी, ती त्यांची विशेष पूजा करीत असे, व या दिव्यांना मनोभावे नमस्कार करून त्यांना गोड पदार्थाचा नैवेद्य ही दाखवीत असे.

एके दिवशी घरात केलेला गोड पदार्थ तिला खाण्याची इच्छा झाली. तिने तो खाल्ला. अचानक तो गोड पदार्थ कसा संपला म्हणून विचारणा झाली असता ,सुनेने भीतीने, तो पदार्थ स्वत: खाल्ला, असे न सांगता उंदरांनी पळवला असा असे सांगितले. उंदरांना याचा राग आला. आपल्यावर आरोप ठेवला म्हणून या सुनेला शिक्षा घडवावी या उद्देशाने त्यांनी रात्री त्या सुनेची चोळी चोरून ती बाहेर पाहुण्यांच्या अंथरुणात नेऊन सोडली. सकाळी हे जेव्हा लक्षात आले तेव्हा सुने बद्दल अकारण अपसमज तयार झाला. (क्रमशः)



## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे

वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### तेथे कर माझे जुळती

वाचकहो व रसीक मित्रांनो,
आज आपण 21 व्या शतकात जीवन जगत आहोत, कालचक्र चालूच असतं. या भूतलावावर किती आले किती गेले, याची गणती नाही, पण काहींच महत्व अबाधित राहते. युगामागुनी चालली युगे असे हे चक्र आहे. पण एखादा चक्रधर श्रीकृष्ण येतो-गीता सांगून जातो महाभारत, रामायण म्हणजे काय? तर शेवटी जीवनमरणाचा संघर्ष, लढा. असे वाटते! फक्त नावात बदल.. हीच गीता नविन जन्माला येते 'ज्ञानेश्वरी'तून एखादा ज्ञानेश्वर सकल विश्वासाठी निर्विकल्प 'पसायदान' मागून जातो तेही वीस वर्षांतील वयात! रामरावण म्हणजे नीतीअनिती, पापपुण्य, सत्‌असत्य यांचे संगरच होय. अशाच सीता-सावित्री, रण-रागिणी आधुनिक काळात सुध्दा दिसतात ना! लता असो की साने गुरुजी,सचिन असो की महानायक हेच लोकमान्य होतात. "मरणात खरोखर जग जगते. "हेच बाबा आमटेची तिसरी पिढी दाखवितात नाही का? माणसाचा योग्य हेतू, कार्य व प्रामाणिक सेवा सिद्ध होते, प्रामाणिकपणा सिद्ध होतो तेव्हा अशा कामाला खूप कर्तृत्व लागते, तसंच प्रेम व नाती टिकविणेही अवघड. नाहीतर दुनिया तयारच असते प्रदर्शन व महाभारत पहायला.. तेव्हा याच फुलण्यातून, फलण्यातून "सत्यमेव जयतेचे नगारे वाजत राहतील.. म्हणूनच म्हणतो, "दिव्यत्वाची जेथं प्रचिती, तेथे कर माझे जुळती. "आज एवढ पुरे ईथंच थांबतो आपण वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा- माणसाचे. शुभ सकाळ. सुप्रभात.



## || श्री दत्त महिमा ||

लेखन सेवा - योगीराज (नितीन) डोळे
आद्यपीठ वरद दत्त संस्थान
श्री क्षेत्र राक्षसभुवन ता.गेवराई जि. बीड

# गणपती बाप्पा मोरया

ज्योतिर्मय साहित्य

आता हे काय दत्त संप्रदायाची माहिती देत असताना एकदम श्री गणेशाचे नामस्मरण कसे असा प्रश्न पडला असेल खरे आहे श्री गणेशाचे आणि वरददत्त संस्थानचे प्राचीन संबंध व श्री गणेशा चे तेथे आगमन कसे याचा एक रंजक इतिहास आपण पाहू या

विजयनगरचे हिंदू साम्राज्य ज्याचे राजे हरिहर आणि बुक्क हे बंधू होते त्या काळातील राजमहालातील स्थापित असलेले श्री गणेश यांना एक दिवस रोजच राज विलासात मिष्टान्न भोजन घेऊन कंटाळा आला व त्यांना त्यांच्या माते चे स्मरण झाले व आईच्या हातचे भोजन करण्याचा मानस निर्माण झाला त्यांची माता पार्वती अर्थात अन्नपूर्णा हिचे स्मरण केले व भोजनाची इच्छा प्रगट केली त्यावेळी अन्नपूर्णा मातेने गोदातीरावर असलेल्या मठामध्ये यावे व भोजन करावे असे सुचवले त्याप्रमाणे त्यांनी थेट राजवाड्यातून गोदातिरा

वरील राक्षसभुवन क्षेत्री आगमन



केले तेव्हापासून या मठामध्ये श्री गणेशाचे आगमन झाले आजही प्राचीन पंचधातूची साधारणतः दोन फूट ते अडीच फूट उंचीची प्रभावाळीसह एक सुंदर मूर्ती विराजमान आहे येताना त्यांनी जी भोजनाची अट घातली होती ती आजही पालन होत आहे मात्र गणपती म्हणले की मोदकाचा नैवेद्य आवश्यकच असतो पण या स्थानी मात्र मोदकाचा नैवेद्य दुर्वांकुर

रक्तवर्णीय पुष्प शमीपत्र याची मला नित्य आवश्यकता नाही असे सुचवले असा शब्द प्रत्यक्ष गणरायांनी दिल्यामुळे आजही तीच प्रथा पालन केली जाते अन्नपूर्णा मातेचा जो महानैवेद्य असतो त्याच मध्ये त्यांचे भोजन होते याशिवाय चतुर्थी व्रता चा आग्रह या स्थानी नाही अशा अटीवर त्यांची आगमन झाले आहे

या परंपरेप्रमाणेच तेथील मोठा अधिपती चतुर्थी व्रत करीत नाहीत नित्य दुर्वा रक्तवर्ण पुष्प शमीपत्र मोदक नसावेत तरी पण श्री गणेशाचे नित्य पूजन अर्चन सुरू आहे असे हे दुर्मिळ स्थान म्हणून दत्त संप्रदाय व गणपती संप्रदाय यांचे अन्योन्य एकत्रीकरण या स्थानी पहावयास मिळते म्हणून जयघोष करतात की गणपती बाप्पा मोरया

मंगलमूर्ती मोरया

## प्रभातपुष्प

षटकोळी माझी
संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

दिप पुजन

आषाढ अमावस्येच्या दिनी
दिप पुजन करुन
दिपोत्सव करु साजरा
दिव्यांची आरास मांडू
मनोभावे पूजन करता
चेहरा होईल हसरा

दिवा,पणती,समईची
स्वच्छता करुन आज
करुया दिप पूजन
पुष्पफुले नि अक्षदा
वाहूनी दिव्यावरी सर्व
मनोभावे करु वंदन

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात वनश्री वनकर यांच्या बाभळीच्या बाया पुस्तकाचा समावेश

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२०२९ च्या नवीन अभ्यासक्रमासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. साधना प्रकाशनातर्फे प्रकाशित आणि सुप्रसिद्ध लेखिका वनश्री वनकर लिखित बाभळीच्या बाया या अत्यंत चर्चिलेल्या पुस्तकाचा समावेश आता पदव्युत्तर (एम.ए. मराठी) अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

मराठी विभागाचे प्रमुख प्रा. (डॉ.) तुकाराम रोंगटे यांनी अधिकृत पत्रकाद्वारे ही घोषणा केली असून, लेखिका वनश्री वनकर यांचे विद्यापीठाच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून अभ्यास आवश्यक

विद्यापीठाने जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, एम.ए. मराठीच्या नवीन अभ्यासक्रमातील MARDSE 40 - वाङ्मयीन चळवळी या अभ्यासपत्रिकेमध्ये ( ) बाभळीच्या बाया या लेखसंग्रहाचा समावेश करण्यात आला आहे.

मराठी विभागाचे प्रमुख प्रा. (डॉ.) तुकाराम रोंगटे यांनी पत्रात नमूद केले आहे की, ''दुर्गाम भागातील महिलांचा संघर्ष लेखिकेने अतिशय जवळून अनुभवला असून तो आपल्या ग्रंथात उत्कृष्टपणे शब्दबद्ध केला आहे. या लेखसंग्रहातील महिलांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य, दुःख आणि प्रतिकूल परिस्थितीवर त्यांनी केलेली मात; या सर्व गोष्टींचा विद्यार्थ्यांनी




सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक परिप्रेक्ष्यातून अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.'' याच पार्श्वभूमीवर अभ्यासक्रमनिर्मिती तज्ज्ञ समितीने या पुस्तकाची निवड केली आहे.

बाभळीच्या बाया पुस्तकाविषयी थोडक्यात

बाभळीच्या बाया हे पुस्तक विदर्भातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील महिलांच्या जगण्यावर, त्यांच्या संघर्षावर आणि शोषणावर प्रकाश टाकते. प्रतिकूल परिस्थितीमध्येही स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या महिलांची वास्तववादी चित्रे लेखिका वनश्री वनकर यांनी या पुस्तकातून अत्यंत प्रांजळ आणि प्रभावीपणे मांडली आहेत. या पुस्तकाचा शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश झाल्याने नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना ग्रामीण समाजव्यवस्था, लिंगभाव आणि महिलांच्या संघर्षाचे आयाम जवळून अभ्यासता येतील.



# एकल विद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य संच वितरण कार्यक्रम संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

जुन्नर (जि. पुणे) - एफटीएस संचलित एकल सामाजिक संस्थेच्या वतीने जुन्नर तालुक्यातील एकल विद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य संच वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एकल संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोजजी बेहडे तसेच वनयात्रा प्रभारी सौ. वृंदाताई जोशी यांच्या हस्ते ज्ञानदीप प्रज्वलन व भारतमाता प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. यावेळी श्री. गिरीधर राठी, डॉ. श्याम कुलकर्णी, श्री. आर. बी. लड्डा, श्री. कोल्हेकर, श्री. राम कुलकर्णी तसेच अंचल प्रतिनिधी व एकल कार्यकर्ते उपस्थित होते.

निकालस फाउंडेशनच्या सौजन्याने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य संच उपलब्ध करून देण्यात आले. फाउंडेशनचे संचालक श्री. रोहित सोमलवार तसेच प्रकल्प समन्वयक श्री. अमोल कोल्हेकर आणि श्री. महेश पेंदाम यांनी साहित्य संचाचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत उपस्थित आचार्य व एकल कार्यकर्त्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

यावेळी ३६ आचार्य आणि ६ एकल कार्यकर्त्यांना शैक्षणिक साहित्य संचांचे वितरण करण्यात आले. या साहित्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जीज्ञासा व गुणवत्ता उंचावण्यास निश्चितच हातभार लागणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. काळूराम मुकणे यांनी केले, तर नंदकुमार बांबळे महाराज यांनी मंत्रपठण करून कार्यक्रमाची सांगता केली.

ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शैक्षणिक साधने पोहोचविण्या चा हा उपक्रम समाजातील शैक्षणिक समतेच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनीता गोडबोले दाम्पत्याचा सत्कार व प्रकट मुलाखत


**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - केशव माधव विश्वस्त निधीच्या वतीने वनवासी बांधवांच्या सेवेसाठी आयुष्य समर्पित केलेल्या पद्मश्री सन्मानित डॉ रामचंद्र गोडबोले व सौ सुनीता गोडबोले दाम्पत्याचा सत्कार व प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

छत्तीसगडमधील नक्षलग्रस्त व अतिदुर्गम भागात बस्तर येथे गेली पस्तीस वर्षे निःस्वार्थी भावनेने वनवासी बांधवांच्या आरोग्यसेवेसाठी कार्य करणारे आयुर्वेदाचार्य डॉ. रामचंद्र गोडबोले व सौ.सुनीता गोडबोले यांना भारत सरकारने सन २०२६ मध्ये त्यांच्या अतुलनीय समाजसेवेबद्दल पद्मश्री या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मान करून गौरविले आहे.

त्यांच्या सेवायज्ञाचा प्रेरणादायी प्रवास, वनवासी समाजातील अनुभव आणि समाजकार्यासाठीची त्यांची प्रेरणा ही प्रकट मुलाखतीतून ऐकण्याची दुर्मिळ संधी आहे.


''येत्या रविवारी दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता कर्वेनगर येथील शैलेश सभागृह, अलंकार पोलीस चौकीजवळ, येथे हा कार्यक्रम होणार



असून आपण या प्रेरणादायी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन केशव माधव चे अध्यक्ष रविंद्र जावळे व सचिव अरविंद देशपांडे यांनी केले आहे.

# शिरीषकुमार पाठक यांची महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेच्या विभाग प्रमुख पदी निवड

**ज्योतिर्मय साहित्य**



पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषद ही मराठी भाषेचा तसेच मराठी साहित्याचा प्रचार व प्रसार करणारी मराठीतील आद्य संस्था आहे. न्यायाधीश गोविंद रानडे, लोकमान्य टिळक आणि न. चि. केळकर यांच्या पुढाकाराने १९०६ साली स्थापन झालेल्या या संस्थेस १२० वर्षाची गौरवशाली परंपरा आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा महाराष्ट्रात साहित्यिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असून शाखेला उत्कृष्ट शाखेचा दोनदा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आम्हास कळविण्यास आनंद होतो की सदर संस्थेप्रती आपली असणारी आस्था तसेच आपण दिलेले सहकार्य याचा विचार करून नुकत्याच झालेल्या बैठकीत कार्यकारिणीने आपली २ वर्षासाठी विभाग प्रमुख पदी निवड केली आहे.

मसापचे साहित्यिक उपक्रम पिंपरी चिंचवड च्या प्रत्येक विभागात पोहचवण्यासाठी ही निवड महत्वपूर्ण आहे. आपल्या पुढील कार्यास शुभेच्छा. पिंपरी - चिंचवड साहित्य कट्टा मधून शिरीषकुमार पाठक यांचे याबद्दल अभिनंदन होत आहे.

# महाविद्यालयीन जीवनाचा आनंद घ्या-प्राचार्य डॉ .तुषार शितोळे

**ज्योतिर्मय साहित्य**

नसरापूर (पुणे)- पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या येथील शंकरराव भेलके महाविद्यालयात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत व महाविद्यालय ओळख (इंडक्शन प्रोग्रॅम) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतामध्ये प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांनी विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयात येऊन आपली शैक्षणिक गुणवत्ता , सामाजिक जबाबदारी आणि बौद्धिक क्षमता वाढवून महाविद्यालयाचे, आपल्या कुटुंबाचे आणि स्वतःचे नाव उंचीवर घेऊन जाऊन एक चांगला नागरिक व्हावे आणि महाविद्यालयीन जीवनाचा आनंद लुटावा असे मत व्यक्त केले .

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी विद्यापीठ गीत गाऊन कार्यक्रमाला औपचारिक सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा. डॉ. आर. बी. ढाकणे यांनी केले.

महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांच्या हस्ते विशेष स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना



महाविद्यालयाच्या विविध विभागांची आणि सोयीसुविधांची ओळख करून देणे हा होता. यावेळी महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्रमुखांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. एस. जी. घाडगे यांनी विद्यार्थी विकास मंडळ, स्कॉलरशिप, आय.जी.सी. आणि अँटी रॅगिंग संदर्भात माहिती दिली.

प्रा. भगवान गावित यांनी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन आणि आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या शुभेच्छा देऊन ग्रंथालय व परीक्षा विभाग यांची सविस्तर माहिती दिली, तर प्रा. डॉ. जी. ए. आवटे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती दिली. प्रा. एम. डी. कोळपे (ट्रेनिंग प्लेसमेंट आणि स्पर्धा परीक्षा), प्रा. एस. जी. रोडे (आविष्कार-संशोधन विभाग), आणि प्रा. एस. व्ही. लांडगे (जिमखाना व सांस्कृतिक विभाग) यांनी आपापल्या विभागांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच, प्रा. जे. ई. गायकवाड (वाणिज्य, स्टडी टूर/इंडस्ट्रियल व्हिजिट, फिल्ड प्रोजेक्ट/ओ.जे.टी.), प्रा. डॉ. जे. डी. शेवते (कला, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) आणि श्री. शिवाजी सोनवणे (प्रशासकीय माहिती) यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी महाविद्यालयात अजित स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती त्या स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांक विद्यार्थ्यांचे अभिनंदन मा .प्राचार्य यांच्या हस्ते पुष्प देऊन करण्यात आले. कार्यक्रमास कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार प्रा. व्ही. एस. कोंडे यांनी मानले, तर सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रा. संदीप लांडगे यांनी पार पाडली.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'मावशी' (आईची प्रतिछाया)

पुढे.....

माई आणि मास्टर दीनानाथ मंगेशकरांच्या संस्कारात वाढलेल्या मंगेशकर कुटुंबात या नात्याचे एक अत्यंत भावुक रूप आपण पाहिले आहे. लतादीदींची लहान बहीण आणि महान गायिका आशा भोसले यांनी तरुण वयात गणपतराव भोसले यांचा हात धरून घरातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. त्या तशा बाहेर पडल्या; पण पुढे अनेक कौटुंबिक वाद आणि खडतर संकटानंतर त्यांनी आपल्या घरी परतण्याचा निर्णय घेतला. त्या जेव्हा आपल्या लहान मुलांना घेऊन परत आल्या, तेव्हा गायन क्षेत्रात प्रसिद्धीच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या लतादीदींनी मनात कोणताही आकस न ठेवता आपल्या या लहान बहिणीचा आणि तिच्या लहान मुलांचा पूर्ण आदराने व प्रेमाने स्वीकार केला. लतादीदींनी स्वतः विवाह न करता, आशाताईंच्या मुलांवर (आपल्या भाच्यांवर) सख्या आईसारखे निस्सीम प्रेम केले, त्यांचे अपार लाड केले आणि त्यांना मावशीचे उबदार छत्र दिले. आईच्या अनुपस्थितीत किंवा कठीण काळात भाच्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे काय असते, याचे हे अत्यंत जिवंत आणि प्रेरक उदाहरण आहे.
(क्रमशः)

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे



© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### विश्व गुरु भारत ..

पुढे.......

शस्त्राशिवाय कोणतेही जीवन नाही!
शस्त्राशिवाय शास्त्र नाही आणि शास्त्राशिवाय शस्त्र नाही!
म्हणूनच आपल्या सनातन धर्माच्या प्रतीकांमध्ये एका हातात शास्त्र धारण करायला लावले आहे, तर लगेच दुसऱ्या हातात शस्त्र दिले आहे! एक हात अभय मुद्रेत आहे, तर दुसऱ्या हातात त्रिशूळ आहे. कारण शस्त्राशिवाय तुम्ही स्वतःचे रक्षण करू शकत नाही, मग इतरांचे तर लांबच राहिले!
भारतीय दुर्दशेचे प्रमुख कारण हेच राहिले की, ते शास्त्रासोबतच आपली शस्त्रेही विसरून गेले किंवा त्यांचे ब्रेन वॉशिंग करून त्यांच्या हातातील शस्त्र आणि शास्त्र दोन्ही हिरावून घेतले गेले.
आजही अनेक देशांमध्ये शस्त्र चालवणे किंवा शस्त्र बाळगणे अनिवार्य आहे. काही देशांमध्ये तर सैनिकी शिक्षण अनिवार्य आहे, ज्याच्याशिवाय सरकारी नोकरीसुद्धा मिळत नाही.
अशा राष्ट्राचा सूर्य अस्त होईल की ज्या राष्ट्रातील सर्व लोकांना शस्त्रविहीन केले गेले आहे त्याचा?
त्या देशांत प्रत्येक नागरिक सैनिक असतो; आणि इथे आपल्याकडे एखादा पूर आला किंवा एखादा नाला जरी पार करायचा असेल, तरी आपल्याला सैन्याला बोलवावे लागते!
स्त्रियांबद्दल तर काय बोलावे, त्यांचे तर जणू सर्व हातच कापून टाकले गेले आहेत! त्यांना अबला अबला ( दुर्बल ) सांगून त्यांचे मानसिक खच्चीकरण केले गेले आहे.
त्यांची मानसिकताही अशी झाली आहे की, एका खड्ड्याला पार करतानाही त्या घाबरतात आणि समोरच्या व्यक्तीकडे काकुळतीने पाहतात! एक झुरळ किंवा पाल जरी समोर आली तरी हार्ट फेल होण्याची भीती असते!
पण एक वेळ अशी होती जेव्हा स्वतः कैकेयी युद्धभूमीत आपल्या पती दशरथाचे रक्षण करत असे! दुर्गा रूप धारण करून स्वतः एका स्त्रीशक्तीने सर्व असुरांचा संहार केला आणि सर्व देवांचे रक्षण केले!
(क्रमशः)

## विचार ते विजय

लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013



### मन शांत असेल तर मार्ग सापडतो


पुढे.....
वादळ थांबण्याची वाट पाहणं म्हणजे शांतता नाही. वादळातही स्वतःला सावरून उभं राहणं म्हणजे खरी शांतता.
काही नाती अशी असतात...
ती तक्रार करत नाहीत.
ती हिशोब ठेवत नाहीत.
ती फक्त वाट पाहत राहतात.
आणि आपण मात्र आपल्या मनातील गोंधळामुळे त्या प्रेमाकडे पाहायलाच विसरतो.
म्हणूनच मन शांत ठेवणं म्हणजे फक्त ध्यान करणं किंवा शांत बसणं नाही.
मन शांत ठेवणं म्हणजे परिस्थितीपेक्षा प्रेम मोठं ठेवणं.
कधी कधी आपल्याला वाटतं, आपल्यासमोर कोणताही मार्ग नाही.
पण खरं तर मार्ग बंद झालेला नसतो...
आपल्या मनातील भीती, राग, अहंकार आणि अस्वस्थतेने तो झाकलेला असतो.
"कधी कधी देव मार्ग दाखवत नाही... फक्त मन शांत करतो; कारण शांत झाल्यावर तोच मार्ग आपल्याला दिसू लागतो."
आणि शांत झालेलं मनच आपल्याला सांगतं—'चल... अजून सगळं संपलेलं नाही.'"
लक्षात ठेवा...
जेव्हा तुम्ही परिस्थितीच्या लाटांवर स्वार न होता, मनाची अथांग शांतता जपायला शिकाल, तोच तुमच्या आयुष्यातील सर्वात मोठा 'विजय' असेल.संकटाच्या वेळी घाबरू नका, मनात शांतता निर्माण करा... आणि 'विचार ते विजय' या प्रवासात संकटांवर मात करत पुढे जा!

# नाते अन् संवाद...

**ज्योतिर्मय साहित्य**

आपल्या संसार सुखाच्या रडगाण्यात आपल्या वैयक्तीक आणि भावनीक, आनंदी, सुखी समाधानी आयुष्य जगण्यासाठी रक्ताची नाती हा केन्द्र बिंदू मानावा लागतो त्याच्या समर्थ सहवासातून सुख दुःखाचे अनुभव आपल्या पदरी पडत असतात त्यात आपण प्रकर्षाने दुःखाच्या आठवणीना कवटाळून कण्हत कुथत जगत असतो. आनंदी आठवणी विस्मरणात ढकलून देत असतो. आपल्यातील ही गाजराची पुंगी आपल्याला सूख देण्यापेक्षा दुःख देत असते हे आपल्याला कळतही असते पण मना ला वळवण्यात आपण अपयशाची पाठराखण करीत असतो. आयुष्याच्या विस्तारीत समुद्रामध्ये आपण प्रेमाची आपली माणसे शोधत असतो तसेच कधी कडक शिस्तीच्या मार्ग दर्शकाना धूडांळत असतो पण प्रेमाची आपुलकीची कौतुक करणारी माणसे म्हणून स्वकियानाच गृहीत धरत असतो. कधीकधी ह्या मृगजलापाठी धावण्यात आनंद लुटीत असतो. हा झाला स्वार्थी अन् एककल्ली विचार पण आपल्याच नातेवाईकाला ह्या पासून आपण खरच आनंद देतो काय? ह्याचा विचार करून सकारात्मक कृतीत उतरवितो काय ? जर हो हे उत्तर असेल तर तो आपल्यासाठी आनंदक्षणच मानला पाहिजे. आपण दुसऱ्याचा आधार होतो का ? आपल्यातील चतकोर भाकर देवून त्यांची भूक थोडीतरी क्षमवतो का ? एखाद्या गरजू आपल्याच नात्यातील विद्यार्थ्याला शिक्षणा साठी मदत करतो काय? ह्या गोष्टीचा सकारात्मक विचार करतो का? करत असालतर आनंदाच्या एक क्षणाच्या तुम्ही जवळ जात असतात. नाते जपण्याचे हे एक साधनच आहे उपाय आहे प्रेमाचे हे लक्षण आहे शिस्तबद्ध मार्ग आहे. आनंदी निस्वार्थ वृत्तीचे हे लक्षण आहे. अर्थात सकारात्मक विचारा बरोबर नात्याची विण घट्ट करण्यासाठी वेळपण दिला पाहिजे. जवळच्या नाते वाईका साठी हा दृष्टीकोन जपणे आवश्यक आहे हा दूरदर्शीपणा केव्हाही लाभदायक ठरणारा असतो मनाला समाधान देणारी ती सकारात्मक बाब आहे.

प्रेम मग नातलगा मधील असो किंवा परस्पर पती पत्नी मधील असो ते मिळविण्यासाठी संवाद साधून त्यास सातत्य राखले पाहिजे दुसऱ्यानी आपल्याला प्रेम द्यावे असे वाटत असेल तर आपणही दुसऱ्या साठी तेच केले पाहिजे. गीव्ह रिस्पेक्ट ॲण्ड टेक रिस्पेक्ट हा नियम येथे ही लागू होतो तेव्हा नातेही अतूट राहते. संवाद साधला पाहिजे त्यासाठी आपल्या अंगी जिद्द, स्व कर्तृत्वावर विश्वास निस्वार्थ मन, समोरच्या व्यक्तीचे अंतरंग ओळखण्याचे कौशल्य, क्षमता आणि सेवाभाव करण्याची माणूसकी असली पाहिजे आपुलकीने आपल्या प्रेमाचे संवर्धन करण्याची किमया थोडी फार तरी असली पाहिजे. अहंकार गैरसमज प्रकर्षाने दूर ठेवले पाहिजे तर नाते टिकवून ठेवता येते . हे मात्र सत्य आहे. स्वामी विवेकानंदाचे बोलके उदाहरण आपल्या समोर आहे. ते म्हणतात केवळ ज्ञान असून भागत नाही ते वेळेला प्रेमाने व्यक्त करता येणे महत्वाचे असते. संवादात गोडवा असला पाहिजे त्या बिजांकुरातून एकोप्याची वेल उगवून त्याला सुगंधी फूले लखडलेली दिसतील आणि त्याचा सुगंध मन भारावून टाकल्या शिवाय. ही समज सदैव लक्षात ठेवूनच पाऊले उचलली पाहिजेत मग नाती आपोआप फोफावत जातील. नात्यातील ऊब आपल्याला मानवेल



केवळ स्वार्थासाठी नात्यांची धरसोड नसावी. नाती थोडीच जपावी पण ती सातत्य ठेवून जपली जावीत. पण जगाशी मात्र मैत्री असावी कारण मैत्रीचा गोडवा नात्यापेक्षा खूप मोठा असतो प्रसंगी मैत्रीतून नाते निर्माण होते. कधी कधी नात्यातून मैत्री निर्माण होते. नात्यातून मैत्री आणि मैत्रीतून गुरू शिष्य नाते निर्माण होवू शकते जसे श्रीकृष्ण व अर्जून प्रमाणे अनेक उदाहरणे आहेत. पण हे जरी खरे असले तरी परिस्थितीनुरूप त्याला महत्व द्यावे लागते. नाते निरोगी ठेवले तर त्यावर आपुलकीचे प्रेमाचे तुषार आपोआप पडतात आणि ते घट्ट होत जाते. त्याला सातत्य टिकविण्याची पकड असणे मात्र आनंद, समाधान मिळविण्या साठी गरजेचे आहे. प्रसंगाचे गांभिर्य ओळखून आपल्या कटू भाषेला आवर द्यावा लागतो. कटू शद्ब हे नेहमी सत्य असले तरी ते बोचरे ठरत असतात त्यामुळे प्रसंगी प्रेमाची घडी पार विस्कटून जाऊ शकते . ताण तणाव निर्माण होवू शकतो त्याचे रूपांतर परस्पर आरोप प्रत्यारोपा मध्ये होऊ शकतात प्रसंगी नाते तूट तात ही म्हणून आनंददायी संवाद साधणे इष्ट असते. मग त्याचा अवलंब करण्यास काय हरकत आहे.?

नाते टिकवणे साठी परस्पर शुद्ध अंतःकरण, प्रामाणिकपणा, विवेक, विश्वास, निर वैरता, शब्दांचा विचार करून वापर, निःस्वार्थ वृत्ती. कृतज्ञतेची जाणीव इत्यादी मूल्यवर्धित विचार कौटुंबिक जीवन व्यवहारात प्रमाणभूत असले पाहिजे. तेच सातत्याने जपले पाहिजे ते अहंकार विरहीत असणे मात्र गरजेचे आहे अन् ते असेल तर नात्याची माळ नेहमी अखंड राहील असे अनेक संतानी आपल्या विचारातून मांडले आहे पण आपण ते वाचले पाहिजे व कृतीत सातत्याने उतरविले पाहिजे.

त्याच बरोबर आपल्या सहज सुलभ वागण्यात समर्पण भावना जपावी लागते. माझे ही चुकू शकते हे संवादातून इतरांची असमाधान मने राखावी लागतात. प्रसंगानुरूप आपल्याही विचाराला मुरड घातली पाहिजे. प्रसंगी कमी पणाची अंगुली आपल्या कडेही वळवावी लागते आणि इतरांच्या मनात प्रसन्नता निर्माण करावीच लागते म्हणजे नाते आपोआप प्रसन्नतेने झळाळलेल पण अन्याय सहन करण्या इतके लवचीक होण्याचे टाळले पाहिजे. दुसऱ्यांचे म्हणणे आदराने ऐकले पाहिजे त्यावर आपणही सकारात्मक विचार केला पाहिजे तेव्हा आपले




प्रत्यक्षात कोठे चुकते हे लक्षात येते पण हे एक महत्वाचे पथ्य पाळले पाहिजे तेव्हा आपल्या नात्याची प्रगति झाल्याशिवाय राहणार नाही. हा प्रेम रेशीम धागा जुळवून आल्यामुळे आनंद आपल्या जीवनात ओसंडून वाहिल्या शिवाय राहणार नाही.

नाते जपणे असल्यास परस्पर संवाद साधण्या चा मार्ग अवलंब केला पाहिजे . क्षमा शूरस्य भूषणम् असे सर्व संत मान्य वचन आहे. पण तुकोबाराय म्हणतात ''क्षमा शस्त्र जया नराची ये हाती । दुष्ट तया प्रति करी ।। आपण क्षमा मागितली की पुढचा सकारात्मक होतो आक्रमकता त्याच्यात शिल्लक रहात नाही आणि नकळत तो आपल्यास मिसळूनच जातो. नाते वाईका कडे पाहून नातेवाईकानी त्यांची अवहेलना करणे टाळले पाहिजे . विनाकारण त्याच्या विषयी गैरसमज करून पराचा कावळा करणे अक्षरशः टाळले पाहिजे कारण तो नातेवाईक ही माणूस आहे हाविचार प्राधान्याने मनात ठेवला पाहिजे संवाद साधला पाहिजे तरच उभयतांच्या मनात आनंद कायम राहील हानाते जपण्याचा मूलमंत्र समजून घेवून उमजून वागले पाहिजे.

नात्याची वीण नाजूक असते त्याला आपुलकीचा ओलावा टिकवून ठेवावा लागतो तरच आनंदी मनाची वेल फुलांनी बहरून आनंद गंध पसरेल. इतकेच !

# जागतिक अवयव दान दिवस

**ज्योतिर्मय साहित्य**


अवयव दान म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा जीवंत असतानाही आपले अवयव गरजू रूग्णांना देणे होय.

साधारणतः मृत्यूनंतर अवयव दाता ८ गरजू रुग्णांचे प्राण वाचवू शकतो.

अवयव दानाबद्दलचे गैरसमज व भीती दूर करणे, जास्तीत जास्त लोकांना या बद्दल माहिती करून देणे आणि मृत्यू नंतर अवयव दान करण्यासाठी जिवंत पणी प्रोत्साहन देणे, प्रेरित करणे व तसे शपथपत्र भरण्यास प्रवृत करणे, तसेच संबंधित डॉक्टरांच्या चमूला व अवयव दात्यांना सन्मानित करणे यासाठी १३ ऑगस्ट या दिवसाला जागतिक अवयव दान दिवस म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आपल्या देशात दरवर्षी साधारणतः ५ लाख रुग्णांना अवयव प्रत्यारोपणाची गरज भासते पण साधारणतः १५००० ते १८००० च प्रत्यारोपण होऊ शकतात. अशी आकडेवारी आहे.

अंदाजे २०,००० जरी प्रत्यारोपण होत असतील तरी ४,८०,००० रुग्णांना अवयव न मिळाल्याने आपले प्राण गमवावे लागतात. गरज आणि दाता यात फार मोठी तफावत आहे. यामुळे या गोष्टीचा प्रचार आणि प्रसार होण्याची फार मोठी गरज आहे. म्हणून हा लेख लिहण्याची खटाटोप.




भारतात अवयव दानाची ऑनलाइन नोंदणी करण्यासाठी राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्थेच्या नाटो ऑफिसिअल वेबसाईट किंवा राष्ट्रीय पोर्टललाला भेट देऊन याची नोंदणी करता येते.

१८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती आधार कार्डद्वारे ऑनलाइन अर्ज करून अवयव दाता म्हणून प्रतिज्ञा घेऊ शकते आणि डिजिटल डोनर कार्ड डाऊनलोड करू शकते.

अवयव दान नोंदणीची प्रक्रिया खालील प्रमाणे आहे.

पात्रता: १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वय वरील संबंधित वेबसाईट वर जाऊन माहिती भरणे, फॉर्ममध्ये नाव, पत्ता, मोबाईल नंबर आणि आधार तपशील प्रविष्ट करणे,

संमती : सर्व किंवा हवे असलेले विशिष्ट अवयव (उदा. डोळे, मूत्रपिंड, यकृत) दान करण्याचा पर्याय निवडणे, अर्ज पूर्ण झाल्यावर तुम्हाला डिजिटल अवयव दाता कार्ड मिळते.

एखादा व्यक्ती जिवंतपणी एक मूत्रपिंड किंवा यकृताचा काही भाग (जो पुन्हा वाढू शकतो) दान करू शकतो. मृत्यूनंतर हृदय, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुसे, स्वादुपिंड आणि डोळे (कॉर्निया) दान करता येऊ शकतात. दात्याच्या सर्व प्रकारच्या संबंधित शारीरिक चाचण्या व मानसिक दृष्ट्या तो सक्षम आहे का? याची सुसंगतता बघून दात्याचे अवयव गरजूना देता येतात. दाता कोणत्याही दबावाशिवाय व स्वेच्छेने अवयव दान करत असल्याची खात्री कायदेशीर रित्या केली जाते.


गिरीश वसेकर ( देशपांडे)
नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००

आपलं आयुष्य हे एकदाच असतं येताना आपण काहीही घेऊन येत नाही आणि जाताना ही सोबत काहीही नेऊ शकत नाही पण जाताना आपण आपले अवयव दान करून गरजू रुग्णाच्या आयुष्याची दोरी बळकट करण्यास हातभार लाऊ शकतो, त्याच जीवन सुंदर करू शकतो आणि आपण नसतानाही त्याला आनंद देऊ शकतो, यापेक्षा मोठे दान कोणतेच असू शकत नाहीं, हो ना?

***

# देहदान


**ज्योतिर्मय साहित्य**

ईश्वराने आपल्याला मनुष्य जन्म दिला आहे. याहून इतर सुंदर कुठलीच गोष्ट नाही. माणसाला मन आहे, भावना आहेत, विचार करण्यासाठी डोकं आहे. म्हणून माणसाने सुद्धा चांगलाच आणि चांगल्याच गोष्टींचा विचार केला पाहिजे. ईश्वराने आपल्याला मनुष्य जन्म तर दिला आहे. पण हा जन्म आणि आपला देह हे नश्वर आहे. कधीना कधी किंवा कालांतराने माणसाचा देह नाश पावणारच आहे. जगात अशी कित्येक लोक आहेत ज्यांना जन्मत: कांही गोष्टींची कमतरता आहे. पण तरीही ते लोक जीवन तर जगतातच. म्हणून आपल्यानंतर आपला देह सत्कारणी लागावा म्हणून आपण देहदान करावे. जेणेकरून आपल्या या चांगल्या विचारामुळे गरजवंतांना खुप मोठा फायदा तर होईलच. पण, ते आपल्यामुळे हे जग नव्याने बघु शकतील.

आपल्या विचारांचे सर्वांनी स्वागत करावेत अशी सुंदर विचारसरणी जोपासून आपण चांगले कार्य करावे. आपल्या सुंदर, थोर विचाराचा एक खुप मोठा आदर्श जगासमोर असेल. सर्वांनी जर देहदानाचा विचार केला तर आपल्याईतके आपणच भाग्यवान असू. आपला आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक जण देहदान करण्यासाठी पुढे येईल.




मृताचे शरीर पवित्र कामासाठी वापरावे. म्हणजे ज्या व्यक्तीला एखाद्या अवयवाची गरज आहे ती गरज भागु शकेल. नश्वर देह चांगल्या कामासाठी वापरावा. म्हणून देहदान जरूर करावे. मिस युनिव्हर्सि आणि बॉलीवूड अभिनेत्री ऐश्वर्या रॉय. यांनी एक जाहिरात केली. त्या जाहिरातीत त्यांनी हे सांगितलं की ''हमारे बाद भी हम ये खूबसूरत दुनिया फिरसे देख सकते है. हम अपनी आँखे किसी कोभी दान कर सकते है. यानिकी ओ हमारे आँखोसे ये दुनिया देख सके. और हम भी उसके जरीये ये दुनिया फिरसे देख सके. आप भी ये काम कर सकते है मृत्यू नंतर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ते शरीर आभ्यासण्यासाठी दिले जाते. पर्यायी विचार करता




शरीरावर केली जाणारी चिकित्सा व शरीर अभ्यास यामुळे मानवजातिच्या उपयोगा करिता देहदानाचा उपयोग होतो. शरीरातील हृदय, यकृत, मूत्रपिंड, डोळे, त्वचा, हाडे हे अवयव दान केल्याने रुग्णांना नवं जीवनदान मिळते. आणि आयुष्य सुधारते. आणि ती व्यक्ती नव्याने आयुष्य जगते. आपल्या देहदानाच्या चांगल्या विचारामुळे. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे आपण कांही देणे लागतो. आणि ते देणं म्हणजे हेच की माणुसकी च्या दृष्टीकोनातून आपण चांगला विचार करू शकतो. आणि खरे तर सामाजिक विचार करता समाजहीत टिकवून ठेवण्यासाठी देहदान हा उत्तम मार्ग होय. आपल्यानंतर जग आपले नाव घेईल. आणि आपल्या नंतरही आपली कीर्ती जगावरी उरेल. म्हणून देहदान हे उत्तम व सर्वश्रेष्ठ दान आहे.

देहदान करावे माणुसपण जगावे
मृत्यूनंतर ही किर्ती रुपी उरावे
देहदान करुनी लागावे सत्कारणी
शिकावे हेचि आपुल्या जीवनी
आपुल्यामुळे मिळावे कुणातरी
नवं जीवनदान
बाळगावे अंगी चांगले कर्मभान
नश्वर देहास करुनी दान
माणुसकीचा करावा सन्मान
करावे देहदान करावे देहदान....!



# युरोप दर्शन

वामन वा. कोठेकर
मोबाईल : +91 98606 99972

**बेल्जियम**

बेल्जियम हा पश्चिम युरोपातील एक देश आहे. बेल्जियमच्या उत्तरेला नेदरलँड्स व उत्तर समुद्र, पूर्वेला जर्मनी, दक्षिणेला लक्झेंबर्ग व फ्रान्स व पश्चिमेला फ्रान्स हे देश आहेत.

ब्रुसेल्स

ब्रुसेल्स हे बेल्जियमचे मुखत्वे राजधानीचे प्राचीन ठिकाण आहे आणि चॉकलेट्स साठी एक प्रसिद्ध शहर म्हणून ओळखले जाते. इथे ग्रँड प्लेस पासून जवळच काही प्राचीन शिल्प आहेत तिथे भेट देऊन आम्ही चॉकलेट शॉप्स मधून वेगवेगळ्या प्रकारचे चॉकलेट्स ची खरेदी केली व पुढील प्रवासाला निघालो.

**लक्झंमबर्ग**

लक्झंमबर्ग या छोट्या देशाचे हे एक राजधानीचे शहर आहे तेथील ट्राम राईड वेगळा अनुभव आहे. तिथे मुक्काम करून तेथून दुसरे दिवशी आम्ही पुढे निघालो. आम्ही स्वित्झर्लंड च्या दिशेने निघालो.

**कुकू क्लॉक**

वाटेत कुकू क्लॉक या ठिकाणी भेट दिली. तेथील कुकू क्लॉक क्राफ्टवर्क बघण्यासारखे आहेत. एका इमारतीत मोठे घड्याळ आहे आणि त्यावरील खिडकी उघडते त्यातून एक पक्षी तासाच्या ठोक्याला बाहेर येऊन अरवतो आणि पुन्हा आत जातो आणि खिडकी बंद होते. या मोठ्या घड्याळाच्या अतिशय सुंदर कलात्मक अशा लहान प्रतिकृती इथे विकत मिळतात. तेथून पुढे निघालो आणि वाटेत ऱ्हाइन नदीवरील ऱ्हाइन फॉल आहे. येथे थांबून बोटीतून जवळ जाऊन वेगाने कोसळणारा ऱ्हाइन फॉल हा धबधबा बघितला अतिशय मनमोहक असे ते दृश्य होते बोटीतूनच काही फोटो काढले आणि परत येऊन रेस्टॉरंट मध्ये सर्वांनी कॉफी घेतली आणि मग स्वित्झर्लंड मधील झुरिक कडे निघालो. क्रमशः



# काव्यशास्त्र
## कविता लिहिण्यापूर्वी

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम् –
bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

### भाग-१: प्रतिभा, अभ्यास आणि पुरुषार्थ

मागील अंकावरून पुढे.....

म्हणूनच संत सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी यांसारख्या संतांनी आपल्या कर्माने मोठेपण प्राप्त केले. आजही अत्यंत सामान्य परिस्थितीतून अनेक विद्यार्थी कठोर परिश्रमाने उच्च शिक्षण घेऊन प्रशासकीय सेवेत पोहोचतात.

कवीसाठीही हाच नियम लागू होतो. जन्मजात प्रतिभा लाभली तर उत्तमच; पण प्रतिभेला अभ्यास, निरीक्षण, चिंतन आणि सातत्यपूर्ण लेखनाची जोड मिळाली तरच ती कालातीत साहित्यनिर्मितीत रूपांतरित होते, अर्थात अंत:करण संवेदनशील असायलाच हवे. लहानात लहान गोष्टीची जाणीव त्याला व्हायला हवी. जगातील प्रथम काव्य वालीमिकी रामायण आहे.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम: शाश्वती: समा: ।
यत् क्रौंच मिथुनादेकम् अवधी: काम मोहितम् ॥ १५॥

वाल्मिकी त्यांच्या शिष्यांसह तमसा नदीवर स्नानसंध्या करायला जातात. त्यावेळी त्या घनदाट अरण्यात वाल्मिकिंना एक क्रौंचपक्षाची जोडी प्रणयाराधनात मग्न असल्याची दिसली व तितक्यात एका व्याधाने शिकार करण्याकरिता मारलेला बाण त्या जोडीतील क्रौंच पक्षाला लागतो व तो जखमी होऊन खाली पडला व गतप्राण झाला. आपल्या जोडीदाराचा वध झालेला पाहून मादी पक्षी करुण स्वरात आक्रोश करू लागली.

त्या पक्ष्यांची जोडी सदैव एकत्र राहणारी होती. त्या पक्ष्याचा वध एका शिकाऱ्याने (निषादाने) केला होता, जो मदोन्मत्त आणि निर्दयी होता. ते हृदयद्रावक दृश्य पाहून वाल्मिकिंच्या अंत:करणात खूप वेदना झाल्या. अशा प्रकारे त्या द्विज (पक्षी) चा वध झालेला पाहून, धर्मात्मा वाल्मीकिच्या अंत:करणात अत्यंत करुणा उत्पन्न झाली. त्या क्रौंची (मादी पक्षी)चा करुण विलाप ऐकून, "हा अधर्म आहे" असे जाणून त्या द्विजश्रेष्ठाच्या मुखातून अचानक उद्गार बाहेर पडतात, ती प्रसिद्ध शापवाणी आहे,

"हे निषादा! तू काममोहाने ग्रस्त असलेल्या या क्रौंच जोडप्यातील एका पक्ष्याचा वध केला आहेस; म्हणून तुला शाश्वत काळपर्यंत प्रतिष्ठा प्राप्त होऊ नये."

त्यानंतर वाल्मिकिंच्या मनात येते

पाद बद्धो अक्षर सम स्तन्त्री लय समन्वित: ।
शोकार्तस्य प्रवृत्तो मी श्लोको भवतु नान्यथा ॥ १८॥

वाल्मीकि यांच्या मनात विचार उत्पन्न झाला, "या शोकाकुल पक्ष्याबद्दल मी हे काय बोललो?" असा विचार करत त्या महान बुद्धिमान ऋषींनी मनन केले आणि मग ते श्रेष्ठ मुनी आपल्या शिष्याना म्हणाले, "हे वचन (उच्चार) अक्षरांनी व चरणांनी युक्त असून, वीणेच्या ताल-लयासारखा सुसंवाद आहे. शोकाने व्याकुळ झालेल्या माझ्याकडून जे उद्गार बाहेर पडले, ते 'श्लोक' म्हणून ओळखले जावोत". त्या मुनीने सांगितलेले हे उत्तम वचन शिष्याने आनंदाने स्विकारले. त्यामुळे ऋषीही प्रसन्न झाले.

येथे "शोक-श्लोक" हा अत्यंत सुंदर भाषिक व काव्यात्मक परिवर्तनाचा क्षण आहे. याच ठिकाणी संस्कृत काव्यपरंपरेचा प्रारंभ झाला असे मानले जाते, आणि वाल्मीकि यांना "आदिकवि" ही पदवी प्राप्त झाली.


क्रमशः भाग २ : कविता म्हणजे यमक नव्हे – काव्यशास्त्र, रस, वृत्त, छंद आणि उत्तम कवी घडविणारी साधना.

# भारतीय संस्कृती

**ज्योतिर्मय साहित्य**

''जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी''

अर्थात आई आणि जन्मभूमी (भारतमाता) स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत. असा विचार घेऊन चालणारी आमची हजारो वर्षांपासूनची एक परंपरा व संस्कृती आहे. ती आपल्या पूर्वजांनी जोपासली आहे. तिलाच आम्ही जीवन पद्धती मानले. माणसाला आपले जीवन समृद्ध करण्यासाठी शारिरिक,मानसिक व बौद्धिक विकास हा आवश्यक ठरतो. स्वामी विवेकानंद यांच्यासारखा तेजस्वी मुलगा असावा असे एका तरुणीला वाटले. म्हणून तीने स्वामीजींना लग्नाची गळ घातली तेव्हा स्वामीजींनी त्या तरुणीला दिलेलं उत्तर सर्वांना आश्चर्यचकित करणारे होते. ते म्हणाले,''माते मीच तुझा मुलगा,मलाच तू मुलगा समज''. परस्त्रीला माता,भगिनी समजणारी हिच आमची संस्कृती !




राष्ट्रमाता जिजाऊ यांनी शिवरायांना घडविले. छत्रपती शिवाजी महाराज यांनी एक आदर्श आपणासमोर ठेवला आहे. त्यांच्या राज्यात महिला सुरक्षित होत्या. युद्धात विजय मिळाल्यानंतर आपल्या सैनिकांनी सोबत येतांना सुभेदाराची सून शिवरायांकडे आणली. त्यांना वाटले आपल्याला काही बक्षीस मिळेल. पण सुभेदाराच्या सुनेची लेकी सारखी बोळवण महाराजांनी केली. हिरकणीच्या पुत्रप्रेम व धाडसाबद्दल तिचा यथोचित सन्मान केला. शिवाजी महाराजांच्या काळात महिलांचा योग्य आदर,सन्मान होत असे. तसेच संत महात्म्यांचा योग्य आदर छत्रपती शिवराय करत होते. हे आपणास शिवचरित्र वाचून लक्षात येते. या संस्कृतीने श्रीरामाचा आदर्श,श्रीकृष्णाची कर्तव्यनिष्ठता वर्णन केली आहे. संत महात्म्यांची व महापुरुषांची ही पुण्यभूमी तसेच कर्मभूमी आहे. साऱ्या जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या संत ज्ञानेश्वरांची भूमी आहे. वेळोवेळी धर्म रक्षणासाठी बलिदान देणारे सुपुत्र इथेच जन्माला आले. ही भूमी केवळ मानवताच नव्हे तर सर्व सजीवांच्या रक्षणाची शिकवण देते.

भौगोलिदृष्ट्या संपन्न व विविधतेने नटलेली आमची भारतमाता व तिचा गौरवशाली इतिहास याचा आम्हांला सार्थ अभिमान आहे. विज्ञान,विविध कला,साहित्य,संगीत,गायन,आध्यत्मिक वारसा यात भारत देश प्राचीन काळापासूनच अग्रेसर आहे. स्वातंत्र्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व क्रांतिकारकांचे स्मरण १५ ऑगष्ट म्हणजेच भारताच्या स्वातंत्र्य दिनाला दरवर्षी आम्हां भारतीयांना होते.

''तेरा वैभव अमर रहे माँ, हम दिन चार रहें न रहे''. अशा या मातृभूमीचे रक्षण करण्याची जबाबदारी आमची आहे. स्वातंत्र्य दिनाच्या शुभ पर्वावर भारतीय संस्कृतीचे जतन करण्याची प्रतिज्ञा प्रत्येकाने घ्यावी हिच सर्वांना विनंती.वंदे मातरम्!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559